# ऋणनिर्देश

''मराठी नवसाक्षर साहित्य संवाद : एक चिकित्सक अभ्यास'' हा माझा वृत्तपत्रविद्या शाखेतील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा प्रबंध तयार करतांना ज्या ज्या संस्थांनी व व्यक्तिंनी मोलाचे सहकार्य केले त्यांच्या बद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत प्रबंधासाठी संशोधकाला मार्गदर्शक म्हणून आदरणीय गुरूवर्य प्राचार्य डॉ. अशोक हजारे, संचालक, प्रौढ, निरंतर शिक्षण व विस्तार सेवा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादयांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. त्यांनी मला अगदी शेवटपर्यंत धीर देत, माझा आत्मविश्वास वृध्दींगत केला. अत्यंत आपुलकीने त्यांनी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

या संशोधन कार्यात मला वेळोवेळी प्रेरणा प्रोत्साहन व सहकार्य केल्याबद्दल प्रा.डॉ. सुधीर गव्हाणे, प्रा.डॉ. जी.टी. देवगांवकर, प्रा.डॉ. किशन धाबे, प्रा.डॉ. संजय मून, प्रा.डॉ. आनंद वाघ, प्रो. प्रल्हाद लुलेकर, प्रा. जयदेव डोळे, प्रा.डॉ. नेरलीकर, प्रा. विजय पार्थीकर, श्री. जनार्दन सोनवणे, डॉ. हरिहर कुलकर्णी, विजय जाधव, प्रा. सुरेश पुरी, प्रा.डॉ. वि.ल. धारूरकर, पर्वत कासुरे, विश्वांभर मोटे, डॉ. कैलास पार्थीकर, प्रकाश आकडे, अशोक निकम, हेलवाडे, भांडवले, अशोक देशमुख, कोठारकर, अभिजीत जोशी, विनायक जाधव व औरंगाबाद आकाशवाणी केंद्राचे अविनाश पायगुडे, रणदिवे, नवसाक्षर साहित्याचे लेखन करणारे साहित्यिक व ज्या नवसाक्षरांनी प्रश्नावली भरून देण्यासाठी सहकार्य केले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

माझी पत्नी सौ. जयश्री बैनाडे व माझी मुले चि. विद्यासागर आणि चि. आशिष यांचे सहकार्यही मोलाचे ठरले. तसेच या प्रबंधाच्या टंकलेखनाचे काम करणारे श्री. प्रदीप भागवत व सौ. विजया भागवत यांचाही मी आभारी आहे.

**सरदारसिंग बैनाडे**